| |
|---|
| नि.फौ.ख.क्र. ३२७४/२०२२<br>सरकार वि. मो.जाकीर वगैरे<br>निशाणी क्र. ४२ |

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. २ यांची शपथेवर सरतपासणी सुरू**

| मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, | | |
|---|---|---|
| नाव | – | रजनी प्रकाश वालदे |
| वय | – | ५० वर्षे |
| धंदा | – | गृहीणी |
| राहणार | – | गडडीगोदाम, नागपूर |

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती संगीता गोगे यांच्याकडून**

१. मी फिर्यादी साजीद कुरेशीला ओळखते. ते आमच्या शेजारी राहतात. मी त्यांची पत्नी झेबाला ओळखते. दोन वर्षापुर्वी घटनेच्यावेळी भांडणाचा आवाज आल्यामुळे आम्ही बाहेर आलो. तेथे गर्दी दिसली. मी साजीद कुरेशीच्या घराच्या बाजुला पाहीले तेव्हा झेबाचे नातेवाईक साजीदला मारताना दिसले. साजीद तेथुन पळाला. त्याच्या नाकाला रक्त लागले होते. झेबाच्या नातेवाईकांच्या हातात काहीतरी शस्त्र होते. त्यानंतर झेबाच्या नातेवाईकांपैकी एका मुलाने साजीद कुरेशीच्या कारवर विट मारली त्यामुळे कारची काच फुटली आणि गाडीचे टप चेंबले. आरोपी दाखवल्यास मी ओळखु शकेन. (आरोपी क्र.१ ते ४ च्या विदयमान वकीलांनी आरोपींची ओळख नाकारली नाही.)

**साक्षीदाराचा उलटतपास आरोपी क्र.१ ते ४ तर्फे वकील श्री शेख सबाहत** –

२. हे म्हणने खरे आहे की, माझे फिर्यादीच्या कुटुंबाशी चांगले संबंध आहेत. माझ्या पोलीसांनी नोंदवलेल्या जबाबात घटनास्थळी झेबाचे नातेवाईक होते असे नमुद नाही, तसेच घटनास्थळी गर्दी होती असे नमुद नाही, तसेच झेबाचे नातेवाईक साजीदला मारताना दिसले असे नमुद नाही. पोलीसांनी ते माझ्या जबाबात का नमुद केले नाही हे मी सांगु शकत नाही.

३. साजीदच्या वडीलांचे घर आणि साजीदचे घर यामध्ये चालत ५ मिनीटांचे अंतर आहे. साजीदच्या घरातुन त्याच्या वडीलांचे घर दिसत नाही. मी कार नंबर पोलीसांना सांगितला नाही. घटनेच्या दिवशी मी पोलीस स्टेशनला गेले नाही.

पोलीस घटनास्थळी आले होते. मी पोलीस स्टेशनला गेलेच नाही. दिनांक २६.०४.२०२२ रोजी पोलीसांनी माझा जबाब माझ्या घरी घेतला होता. हे म्हणने खरे नाही की, माझे फिर्यादीच्या कुटुंबाशी चांगले संबंध असल्यामुळे मी त्यांच्या बाजुने खोटी साक्ष देत आहे. हे म्हणने खरे नाही की, झेबाच्या नातेवाईकांनी साजीदला मारहाण केली आणि त्यामुळे साजीदच्या नाकातुन रक्त येत होते, हे मी खोटे सांगते आहे. हे म्हणने खरे नाही की, झेबाच्या नातेवाईकांपैकी एका मुलाने साजीदच्या कारचा काच फोडला आणि कारचे टप चेंबवले हे मी खोटे सांगते आहे. हे म्हणने खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण</u>**

**<u>फेरतपास काही नाही</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत — माझे समक्ष,

नागपूर — (श्रीमती. एस.टी. दंडे)
दिनांकः–२१.०३.२०२४ — मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर